**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६११/२००८**

**१) श्री रमेशचंद्र शंकरलाल साबु**
**मु.पो.अनंत कॅालनी, रिसोड, ता.रिसोड, जि.वाशिम**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.)**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद, रिसोड, ता.रिसोड, जिल्हा वाशिम.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.६.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२००६ रोजी नगर परिषद क्षेत्रात असलेल्या सव्र मालमत्ता धारकांची माहिती नगरपरिषद स्थापन झाल्यापासून आजपर्यंत. खालील विचारलेल्या सर्व माहितीप्रमाणे प्रत्येक मालमत्ता धारकांची माहिती पुरविणेबाबत. रिसोड नगर परिषद क्षेत्रातील प्रत्येकी सर्व मालमत्ता धारकांची खालीलप्रमाणे माहिती.

१) मालमत्ता धारकांचे नोंव

२) मालमत्ता क्रमांक

३) रहिवाशी उपयोगाकरिता किंवा बिगर रहिवाशीकरिता

४) वार्ड क्रमांक

५) एकुण प्लॅाटचे क्षेत्रफळ

६) एकुण बांधकामाचे क्षेत्रफळ

७) एकुण बांधकामाचे चटईक्षेत्र

८) मालमत्ता कर आकारणीसाठी केलेलया झोनची माहिती

९) मालमत्ता बांधकाम प्रकार अ) सिमेंट कँाक्रीट.

ब) सिमेंट कँाक्रिट व दगडमातीचे बांधकाम क) दगड मातीच

ड) झोपडपटटी

१०) प्रती चौरसफुट लावलेला अपेक्षीत भाडे दर

११) नगर परिषद स्थापन झाल्यानंतर करण्यात आलेली कर आकारणी व त्याचे वर्ष

१२) मुख्याधिकारी यांनी आकारलेली कर आकारणी (अपेक्षीत प्रती चौ.फुट भाडेनुसार)

१३) मुख्याधिकारी यांनी आकारलेल्या कर आकारणीवर (अपेक्षीत प्रती चौ.फुट भाडेनुसार) सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी मंजूर केलेली कर आकारणी

१४) सहाय्यक संचालक यांनी घेतलेल्या सुनावणीनंतर कमी झालेली अपेक्षीत भाडे व त्यावर केलेली कर आकारणी

१५) मालमत्ता कर अपील समितीने मंजूर केलेले अंतीम कर आकारणी योग्य मालमत्तेचे भाडे

१६) कर अपील समितीमध्ये ज्यांनी आक्षेप घेतलेले नसेल त्यांना लावलेले कर आकारणी योग्य भाडे

१७) सर्व प्रक्रिया झाल्यानंतर लावण्यात आलेल्या वार्षिक कराची माहिती

१८) प्रत्यक्ष कर आकारणीचे दर म्हणजे मालमत्तेचे अपेक्षीत भाडयावर लावलेला मालमत्ता कर, शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्षकर

१९) मालमत्तेच्या प्लॅाटचा मालकी हक्क म्हणजे शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन आहेत किंवा स्वत:च्या मालकीची जागा आहे

२०) नवीन मालमत्तेवर आकारण्यात आलेला कर (यांची अजून नगर रचना कार्यालयाकडून अपील सुनावणी झालेली नाही व तसेच मालमत्ता कर अपील समितीकडून सुनावणी झालेली नाही अशा व्यक्तींना लावलेला नवीन मालमत्तेवरचा कर)

२१)	मोकळया प्लॅफाटधारकावरील लावलेला कर

२२)	अपील माहिती अधिका-यांचे नांव व पत्ता.सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

नगर परिषद स्थापन झाल्यापासून आतापर्यंत असा माहितीचा कालावधी दिला असून माहिती व्यक्त्ीशः (लागणारा सर्व खर्च मी भरण्यास तयार आहे तो कळविावा )घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून यते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.८.२००६ रोजी वरील विषयान्वये संदर्भाकिंत अर्जास अनुसरुण आपणास कळविण्यात येते की, नगर परिषदेची स्थापना १६ वर्षा पूर्वीची आहे. तेव्हापासूनच्या काळाचे अभिलेख शोधून आपणास माहिती पुरविणे नियमाअंतर्गत विहित मुदतीमध्ये शक्य होत नाही. शिवाय आपण जे मुद्दे मांडून माहितीची मागणी केली आहे तशा विषयानुसार नगर परिषदेने अभिलेख रचना केलेली नसल्याने आपणास निश्चित स्वरुपात कशी व कोणती माहिती द्यावी याचा बोध होत नाही.

म्हणून आपणास विनंती करण्यात येते की, आपण नगर परिषदेत उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची निरीक्षणे इत्यादी घेऊन अवलोकनाअंती विशिष्ट प्रकारच्या अभिलेख्यातील माहितीची मागणी केल्यास त्यासंबंधाने दस्ताऐवजासह माहित पुरविणे शक्य होईल. त्या दृष्टीने आपण कार्यवाही करुन सहकार्य करावे, अशी विनंती आहे असे मुख्याधिकारी तथा जन माहिी अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांचे दिनांक १४.६.२००६ व १५.७.२००६ च्या अर्जानुसार कळविलेले दिसते.

सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.९.२००६ रोजी दिला आहे. सदरच्या निर्णयामध्ये १ ते २३ मुद्यांची माहिती अपीलार्थीस देण्यासंबंधाने काही अडचणी असल्यास विषद करण्याची संधी उपस्थित

असलेल्या अधिकारीयांना देण्यात आली. त्यांच्या अडचणीचे निवारण करुन अपीलार्थी यांना त्यांचे शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांना दिनांक १५.७.२००६ रोजी दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने १५ दिवसांचे आंत माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सदरच्या निर्णयाचे अनुषंगाने दिनांक १३.९.२००६ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेली मालमत्ता कर व नोंदी फेर फार बाबत एकुण १५ व २२ मुद्यांची माहिती आपणांस नगर परिषद रिसोउ पुरविण्यास तयार आहे. त्याकरिता न.पा.ने वसुली लिपीक श्री एस.जे. मिसाळ यांची नियुक्ती केली आहे. करिता आपणांस सूचित करण्यात येते की, आपण वसुली विभागातील श्री एस.जे. मिसाळ वसुली लिपिक, यांचेकडून आपणांस आवश्यक त्या अभिलेख व माहितीच्या सत्यप्रती आपल्या खर्चाने प्राप्त करुन घ्याव्यात. तसेच श्री एस.जे. मिसाळ वसुली लिपिक यांना सदरच्या पत्राची प्रतिलीपी देवून आपण श्री रमेशचंद्र साबू यांना आवश्यक असलेल्या व कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहिती व अभिलेख्याच्या सत्य प्रती काढून त्यांचे खार्चाने त्यांना पुरवाव्यात. व मुळ सर्व रेकार्ड अभिलेख कामानंतर कार्यालयात पूर्ववत ठेवावे, याची जबाबदारी आपणावर राहील असे आदेश दिलेले दिसून येते. दिनांक १५.११.२००६ रोजी वसुली लिपिक श्री एस.जी.मिसाळ यांनी १५ ते २२ मुद्यांच्या माहिती बाबत मुख्याधिकारी नगर परिषद यांना दिनांक १३.९.२००६ च्या पत्राचे संदर्भात वरील विषयानुसार श्री रमेशचंद्र साबु यांना असेसमेंट रजिस्टरच्या सन १९९०-९१ नुसार सन १९९२-९३ नुसार व सन २००२-०३ नुसार एकुण २२ बावीस रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती काढून दिल्या आहेत व मुळ रजिस्टर व्यवस्थित कार्यालयात पूर्ववत ठेवले आहे. व अशोक कोंडजी मोरे यांनी अद्याप झेरॉक्स साठी संपर्क साधला नाही, करीता सादर. सोबत झ ेरॉक्स दिलेल्या रजिस्टरची यादी जोडली आहे. त्यावर संबंधीत श्री मोरे यांना कळवावे. त्यांना माहितीची गरज नसल्यास तसे विचारावे असे मुख्याधिकारी यांचे आदेश सदरच्या पत्रावर दिसून येते.

असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.३.२००७ रोजी

अपील अधिका-याकडे माहिती देण्याची लेखी हमी दिल्यानंतर माहिती न दिल्यामुळे, माहिती देतो असे सांगून वेळ घालविल्यानंतर अपूर्ण माहिती देवून उपलब्ध असताना उर्वरित माहिती नाकारल्यामुळे अशा प्रकारचे द्वितीय अपील दाखल करण्याचे कारण दिले आहे. अपील विलंबाने दाखलसाठी माफीसाठी अर्ज केला आहे.

अपील सुनावणीच्या वेळेस सुरुवातीलाच अपीलकर्ता यांनी विलंबाने दाखल केल्याबध्दल काहीही माहिती दिली नाही. तसेच मात्र माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे घटनाक्रम घडलेला आहे त्याची कागदपत्रे सुध्दा अपीलकर्ता यांनी दाखल केली नाही. मात्र माहिती पाहिजे म्हणून त्यांनी अपील दाखल केले आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलामध्ये माहिती उपलब्ध करुन दिल्याबध्दलची माहिती देणे ही जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे त्यामुळे त्यांनी दिनांक ९.६.२००८ रोजी खुलासा दाखल केला आहे. सदरच्या खुलाशामध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही १६ वर्षा पूर्वीपासूनची मागितलेली असून सदर्हु माहितीचा तपशिल क्लिष्ट व व्यापक प्रमाणात असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी सदर्हु माहिती विहित नमून्यात मागणी केलेली असल्यामुळे मागितलेली माहिती नगर परिषद अभिलेख्यात त्यांनी मागितलेल्या विशिष्ट नमून्यात उपलब्ध नसल्यामुळे सदर्हु माहिती विहित मुदतीत देणे शक्य नसल्यामुळे नगर परिषदेने पत्र क्रमांक ४९५ व ५६४ दिनांक २६.६.०६ व २६.६.०७ नुसार मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई यांचे मार्गदर्शन मिळण्याबाबत पत्र दिले होते. तसेच अपीलर्त्यास पत्र क्रमांक ५६०/५६१, दिनांक २६.७.२००६ नुसार कळविण्यात आले होते. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांनी मागणी केलेल्या मुद्याप्रमाणे नगर परिषदेच्या अभिलेख्यात उपलब्ध नसल्यामुळे व वरील माहिती त्यांना विहित मुदतीत देणे शक्य होत नसल्यामुळे अपीलकर्त्यास याबाबत आपण नगरपरिषदेत उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची पाहाणी करुन अवलोकन करावे व उपलब्ध अभिलेख्यातून आवश्यक माहितीची मागणी करावी जेणेकरुन ती देणे शक्य होईल याबाबत पत्र क्रमांक५८७/२००६ दिनांक २.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. तरी सुध्दा

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १६.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. वर नमूद केल्याप्रमाणे अपीलाचा निर्णय देण्यात आलेला आहे. त्यानुसार नगर परिषदेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरण करुन उपलब्ध करुन घ्याव्या असे कळविण्यात आले होते. त्यानुसार नगर परिषदेचे पत्र क्रमांक ७३२/०६ दिनांक १३.९.२००६ अन्वये अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. तसेच वरील माहितीच्या अभिलेख्याची झेरॉक्स प्रती काढण्याकरीता व रेकार्ड उपलबध करुन देण्याकरीता नगर परिषद कार्यालयातील लिपिक श्री एस.जे. मिसाळ याची वरील पत्रानुसार नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार अपीलकर्ता यांनी नगर परिषदेकडे उपलब्ध असलैल्या कर आकारणी संबंधीच्या एकुण २२ रजिस्टरच्या छायांकित प्रती देण्यात आलेल्या असून उर्वरित उपलब्ध असल्यास जागेच्या नोंदीच्या माहितीच्या छायांकित प्रती सुध्दा त्यांना नगर परिषदेकडून देण्याकरीता संपर्क केला होता. तसेच अपीलकर्ता यांना मागितलेली संपुर्ण माहिती वरील दिलेल्या २२ रजिस्टरच्या कर सुध्दा यादीमध्ये (अंतर्भूत) उपलब्ध असून याव्यतिरिक्त त्यांना अभिलेख्याची माहिती आवश्यक असल्यास ती नगर परिषद देण्यास तयार आहे. तसेच हा रेकार्ड सुध्दा त्यांना वरील माहिती देण्यास नगरपरिषदे तर्फे नाकारण्यात आलेले नसून त्यांना आवश्यक असलेली कोणतीही माहिती नगरपरिषद देण्यात तयार आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेले अपील हे मुद्याम आकसापोटी, त्रास देण्याचे दृष्टीने शासकिय वेळ व श्रम वाया घालविण्यात येत आहे. कारण अपीलकर्ता हे त्यावेळी असलेल्या नगर परिषद अध्यक्षा यांचे पती असून ते स्वत: नगर परिषद स्विकृत सदस्य असल्यामुळे वरील माहिती ते स्वत: नगर परिषद कार्यालयात उपलब्ध अभिलेख्यातून पाहू शकत असताना सुध्दा अशा प्रकारे माहितीच्या अधिकारात मागणी करुन त्रास देण्याच्या दृष्टीने शासकिय वेळ व श्रम वाया घालवित आहे, असे दिसून येते. त्यामुळे वरील सर्व बाबीचा विचार करुन अपीलकर्ता यांनी दाखल केलेले अपील खारीज करण्यात यावे असा खुलासा दाखल केला आहे.

मुख्याधिकारी, नगर परिषद रिसोड यांनी दिनांक २६.७.२००६ रोजी मा. आयुक्त,

राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकिय भवन, मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदरच्या अर्जाच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्रामध्ये उपरोक्त संदर्भाकिंत विषयानुसार अर्जदार श्री रमेशचंद्र शंकरलाल साबु यांनी दिनांक १५.७.२००६ रोजी माहिती अधिकारात अर्ज सादर केला असून अर्जामध्ये रिसोड नगरपालीकेची स्थापना झाल्यापासून म्हणजे सन १९८९-९० ते सन २००६ पर्यंतचे नगर पालीका क्षेत्रातील आतापर्यंत झालेल्या संपूर्ण नोंदी किंवा फेर फार केल्याची संपूर्ण कागदपत्रासह व्यापक प्रमाणात माहिती मुदयानुसार प्रती मालमत्ता धारकाचे नोंदी किंवा फेर फार ची माहिती एकुण मागील १७ वर्षाची सोबतच्या अर्जाहनुसार मागितली असून सदरहू माहिती अतिशय क्लिष्ट स्वरुपाची असून संपुर्ण माहिती तयार करुन देण्याकरीता व्यापक कर्मचारी वेळ व एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागणेची शक्यता आहे. त्यामुळे नगर पालीकेची इतर वसुलीचे कामे व फेरमुल्यांकनची कार्यवाही करणे शक्य होणार नाही व नगर पालीकेचे दैनंदिन कर वसुली कामात व कार्यालयीन कामकाजात अडचण निर्माण होऊन दैनंदिन कामात विलंब होईल तसेच नगर पालीकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

अर्जदाराने मागितलेली माहिती ही ढोबळ स्वरुपात मागीतली असून एखादया विशीष्ट प्रकरणात नमूद करुन त्या प्रकारची माहिती अर्जदारास देता आली असती. अर्जदाराने मागितलेली माहिती देणे शक्य होणार नाही. या अगोदर सुध्दा अशा प्रकारची व्यापक स्वरुपाची माहिती अर्जदाराने मागितली असून सदरहू अर्ज आपणाकडे मार्गदर्शनाकरीता या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४९५, दिनांक २६.६.२००६ रोजी पाठविण्यात आला आहे.

अर्जदाराने मागीतलेली माहिती ही हेतुपुरस्पर व नगर परिषद कर्मचा-यांबध्दल आकस भवनेपोटी व खोडसाळ पणाने मागितल्याची दिसते कारण अर्जदार श्री रमेशचंद्र साबु हे विद्यमान नगराध्यक्षाचे पती असून हे नगर परिषदेचे विद्यमान स्विकृत सदस्य आहे. त्यामुळे राजकीय द्ष्टीने कर्मचा-यांना त्रास देण्याकरीता ते अशा प्रकारचे वारंवार अर्ज करुन माहिती अधिकराचा दुरुपयोग करीत आहेत. तरी सदरहू अर्जदारांनी माहिती अधिकरात केलेला अर्ज

खारीज करुन योग्य ते मार्गदर्शन करण्यात यावे ही विनंती.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. सदरच्या तक्रारीचा निर्णय सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी दिलेली दिसून येतो. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये मुख्याधिकारी नगर परिषद, रिसोड यांनी त्यांचा खुलास दाखल केला आहे.

अपीलकर्ता यांनी अर्जात मागितलेल्या माहितीचा विचार कातर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांन सदरची माहिती ही जूनी व अतिशय व्यापक स्वरुपात मागितलेली दिसून यते. अर्थात अशी माहिती मागितल्यानंतर सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(९) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाची साधन सामुग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवाली लागत नसल्यास किंवा सदरचे अभिलेखे सुरक्षित ठेवण्यास किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानिकारक नसल्यास माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्या स्वरुपात सर्वसाधारणपणे पुरविण्यात येईल, असे म्हटले आहे. या तरतूदीचा विचार केल्यास व जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा व माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी व्यवस्था केलेली आहे त्यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास सार्वजनिक प्राधिकरणाचा स्वतंत्रपणे लिपिक नियुक्त करावा लागेल. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास प्रमाणाबाहेर साधन सामुग्री वळवावी लागली आहे असे दिसून येते. सदरच्या तरतूदीच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) यांनी प्रकाशित केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ५४ वर असे नमूद केले आहे की, जर शासकिय सामुग्रीचा फार मोठा अपव्यय होईल अशी माहिती गोळा करण्यात व अशा प्रकारची माहिती देण्यात येणार असेल तर अशी माहिती देण्याचे माहिती अधिका-यांवर बंधन नाही. त्यामुळे अशा प्रकारचे ठोक (व्हयाल्युमिनिअस) माहिती पुरविण्यास नकार देवू शकेल. मात्र प्रथम रितसर अर्ज स्विकारावा व मग रितसर नकार द्यावयाचा, असे विश्लेषण केलेले दिसून येते. परंतु सदरच्या प्रकरणात अपीलकर्ता यांना

माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे उत्तर दिलेले दिसून येत नाही तर अभिलेख हा मागितलेल्या माहितीच्या विषयानुसार नगर परिषदेने अभिलेखाची रचना केलेली नसल्याने माहिती उपलब्ध करुन कशी द्यावी याचा बोध होत नाही व म्हणून उपलब्ध अभिलेख्यांचे निरीक्षण घेवून अवलोकनाअंती विशिष्ट प्रकारच्या अभिलेख्यांच्या माहितीची मागणी केल्यास त्यासंबधीचा दस्तऐवजातून माहिती पुरविणे शक्य होईल. त्यादृष्टीने आपण कार्यवाही करुन सहकार्य करावे असे कळविलेले दिसून येते. असे उत्तर देण सुध्दा अधिनियमाच्या कलम २ (१)(ञ) प्रमाणे माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली व या अधिनियमानुसार मिळविण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे व त्यात १) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेखे यांची पाहाणी करणे २) दस्तऐवज किंवा अभिलेखाची टिपणी, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे असा आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर हे योग्य आहे. अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे जे कारण दिलेले ओ ती कारणे खालीलप्रमाणे आहे.

१) कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून अर्ज स्विकारण्यास नकार दिला
२) विर्निदिष्ट केलेल्या वेळी माहिती सादर केली नाही किंवा माहिती मिळविण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली आहे किंवा जाणिवपूर्वक चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिली आहे किंवा मागितलेली माहिती नष्ट केली आहे किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे असे आयोगाचे मत झाले असेल तर शास्ती लादण्याची तरतूद आहे.

परंतु या प्रकरणामध्ये सुरुवातीपासून कोणत्याही प्रकारे माहितीचा अर्ज नाकारलेला नाही. माहिती विहित मुदतीत का देवू शकत नाही याचे कारण दिले आहे व त्यनंतर प्रथम अपीलाचा निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यकरीता लिपिक नियुक्त केले आहे, त्यातही १७ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

वास्तविक निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन ध्यावी असे आदेश असल्यामुळे

अपीलकर्ता यांनी त्यांच्या २२ मुद्यांची माहिती ही निरीक्षण करुन उपलब्ध करुन घ्यावयास पाहिजे होती. आता २२ मुद्यांपैकी माहिती मिळाली नाही हे आयोगापुढे सांगणे व तेही आयोगाकडे विलंबाने अपील दाखल करणे हे अधिनियमाच्या तरतूदीशी सुसंगत नाही. तसेच माहिती अधिकारी यांनी जी बाब प्रथम अपीलीय अधिकारी तसेच राज्य माहिती आयोगाचे निदर्शनास आणली ती अशी की अपीलकर्ता यांच पत्नी त्यावेळेस नगर परिषदेची अध्यक्षा होती वअपीलकर्ता हे स्वतः सुध्दा स्विकृत नगर सेवक होते. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन घेणे सहज शक्य आहे असे त्यांचे म्हणणे आहे. असे असताना सुध्दा ते माहितीच्या अधिकारात माहिती मागतात व त्यातही नगर परिषद स्थापन झाल्यापासून. व त्यामुळै माहिती अधिकारी यंनी जो खुलासा सादर केला आहे त्य खुलाशातील त्यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसते. तसेच हीच माहिती त्यांनी श्री अशोक मोटे यांना दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्र धारकास मागावयास लावली आहे व त्यांची अपील क्रमांक १६१३/२००७ आजच सुनावणीस आहे असेही आयोगाचे निदर्शनास आणले त्यावरुन तर अपीलकर्ता हे गैरवापर निश्चितच करीत आहेत व अधिका-यांना वेठीस धरुन त्यांची कामे करुन घेण्याचा त्यांचा उद्येश दिसून येतो. परंतु अशा प्रवृत्तीस अधिका-यांनी बळी पडू नये.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा व्यापक जन हिताच्या दृष्टीने माहिती मागण्याकरीता पारीत करण्यात आला आहे. व्यापक जन हिताच्या दृष्टीने माहिती मागणे तसेच निश्चित प्रकारची माहिती मागणे हे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी मोघम माहिती मागितल्याने किंवा संपुर्ण माहिती ही त्या प्राधिकरणात उपलब्ध असेल ती माहिती मागणे यातून कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित दिसून येत नाही. अपीलकर्ता यानी त्यांच्या अपीलामध्ये कोणत्याही प्रकारे किती मुद्याची माहिती मिळाली व किती मुद्याची माहिती राहीली आहे हे नमूद केलेले नाही व तशा प्रकारचा खुलासा सुध्दा केलेला नाही. जेव्हा आयोगाकडे न्याय मागण्याकरीता यावयाचे असते त्यावेळेस सुध्दा ते निश्चितपणे कोण्त्याही प्रकारचे मुद्ये घेवून आले नाही व त्यामुळे ज्या माहितीच्या संदर्भात त्यांना स्वतः निश्चित नाही त्याबध्दलची माहिती त्यांना उपलब्ध झाली किंवा नाही याचा निर्णय देणे हे आयोगाला सुध्दा शक्य नाही.

जन माहिती अधिका-यापासून तर आयोगापर्यंत संपुर्ण मोघमच बोलायचे व त्यातून न्याय मागायचा हा माहितीच्या अधिकाराचा गैरवापर आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना दिनाक १५.७.०६ व दिनांक १४.६.०६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यांचे द्वितीय अपीलामध्ये कोणत्याही प्रकारे अपूर्ण माहितीच्या बध्दल खुलासा नसल्यामुळै सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाच एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ११.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**